**प्रेसनोट दि.१२/०३/२०१९**

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे**

**<u>वृद्ध ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिकाचे अपहरणातून पोलीसांनी केली सुटका</u>**

दि.०९/०३/२०१९ रोजी पुणे पोलीस नियंत्रण कक्षामार्फत माहिती मिळाली की, कोरेगाव पार्क, मुगल गार्डन सोसायटी, ४ था मजला येथील फ्लॅटमध्ये काही लोक घुसले आहे व सदर फ्लॅटमधील महिलांना मदत पाहिजे आहे, वगैरे खबर प्राप्त होताच श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर हे स्टाफसह रवाना होवून घटनास्थळी पोहोचले. सदर फ्लॅटमध्ये इसम नामे (१) मोहम्मद रजा इमदाद अली बुरानी, रा. फ्लॅट नं २, शिरीन आर्पा, गिता सोसायटीचे समोर कॅम्प पुणे. (२) खालीद अशरफ रजा, रा.अंबा वाटीका एनआयबीएम रोड बि. नं. बी-५, फ्लॅट नं ३०३, कोंढवा पुणे (३)राम शाम मिरे वय २४ वर्षे धंदा, भाजीविक्री, रा. शनीआळी, वडारवस्ती, येरवडा पुणे. (४) आशिष मनोहर धोत्रे, रा. स.नं १०, सेवक चौक, भाजी मार्केट जवळ, येरवडा, पुणे (५) अर्जुन तुकाराम गायकवाड, रा.लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे हे मिळून आले. त्यांना तात्काळ ताब्यात घेतले व फ्लॅटमध्ये हजा असणारी महिला नामे हेमलता ज्ञानदेव मोरे, रा.मुगल गार्डन, फ्लॅट नं.१७ व १८, ४ था मजला, कोरेगाव पार्क, लेन नं.५, पुणे यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये त्यांनी वरील ताब्यात घेतलेले इसम व त्यांचे साथीदार यांनी बेकायदेशीर जमाव जमवून त्यांचे घराचा दरवाजा तोडून घरामध्ये प्रवेश करून नमूद महिला व त्यांची मुलगी मोनिका व त्यांचे वडील काशीनाथ चित्ते, वय ८५ यांना शिवीगाळी व दमदाटी करून, धमकी देवून त्यांचे मोबाईल हिसकावून घेवून, काशीनाथ चित्ते यांना घेवून जावून त्यांचे अपहरण केले आहे, वगैरे हकीकत सांगितल्याने ताब्यातील सर्व इसमांना पोलीस स्टेशनला घेवून येवून अपहरण केलेल्या व्यक्ती संदर्भाने तपास करून अपहरण केलेले वयोवृद्ध इसम काशीनाथ वेडू चित्ते, वय ८५, रा. सदर यांचा शोध घेवून, त्यांचेसमवेत असलेल्या आरोपीसह त्यांना पोलीस स्टेशनला आणले व वरील आरोपीविरूद्ध कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनला तात्काळ गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपींना वरील गुन्हयात अटक करून त्यांना मा. न्यायालयात हजर करून त्यांची पोलीस कस्टडी घेण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग साो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.डॉ.प्रीती टिपरे, सहा. पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे, श्री.गणेश माने पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. प्रकाश लंघे सहा.पोलीस उप निरीक्षक, श्री. रावसाहेब आदर्शे सहा.पोलीस उप निरीक्षक, श्री. शरद कणसे सहा.पोलीस उप निरीक्षक व कर्मचारी दिनेश शिंदे, संदिप गायकवाड, विनोद साळुंखे, रियाज शेख, रमजान खान, संदिप ठाकूर, संदीपकुमार गर्जे, किशोर पवार, अमोल जाधव, जगन्नाथ शिनलकर, प्रकाश माने, निशीकांत सावंत, तुकाराम शिंदे, मंगेश बडे यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे